# ठाणे महानगरपालिका, ठाणे

## सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची सेवा करार पध्दतीने विवक्षित कामांसाठी घेणेकरीता कंत्राटी जाहिरात.

**वाचा :- शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/दिनांक १७ डिसेंबर २०१६.**

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील "सुरक्षा अधिकारी" या पदाकरीता सहा महिन्यांचे कालावधीसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. शासन निर्णय क्र.संक्रिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७ डिसेंबर, २०१६ अन्वये शासकीय/निमशासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची सेवा करार पध्दतीने विवक्षित कामांसाठी पात्र व इच्छुक उमेदवारांकडुन अर्ज ठाणे महानगरपालिका, ठाणे, मुख्य आस्थापना विभाग, प्रशासकीय भवन, पहिला मजला, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे यांचेकडे दि. २६/०७/२०२२ ते दि. ०४/०८/२०२२ या कालावधीत कार्यालयीन वेळेपर्यंत मागविण्यात येत आहेत. अर्जाच्या लिफाफ्यावर करार पध्दतीने मानधन तत्वावर विवक्षित कामासाठी अर्ज असे ठळक अक्षरांत नमूद करावे. अर्जासोबत स्वतःचा पत्ता असलेला व त्यावर रु.५/- चे पोस्ट मुंद्राक चिकटवेल्या १५ सें.मी x १० सें.मी. आकाराचा लिफाफा पाठविण्यात यावा. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

| अ. क्र. | पदनाम | वयोमर्यादा | मासिक पारिश्रमिक | एकुण जागा | पात्रतेचा निकष |
|---|---|---|---|---|---|
| १. | सुरक्षा अधिकारी | किमान - ५८ वर्ष व कमाल - ६५ वर्ष | शासन निर्णय क्र.संक्रिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७ डिसेंबर, २०१६ अन्वये देय मासिक पारिश्रामिक (शासन निर्णयातील ड (१)(क) च्या अनुषंगाने) | ०१ | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी.<br>२) लष्कर, निमलष्करी दलातील ज्युनिअर कमिशन्ड ऑफिसर अथवा पोलीस दलातील निरीक्षक या पदावर काम केल्याचा ५ वर्षाचा अनुभव.<br>३) ५वर्षे मिलीटरीतील सेकंड लेफ्टनंट अथवा मेजर पदाचा अनुभवास प्राधान्य.<br>४) वयोमर्यादा ६५ वर्षेपेक्षा अधिक असू नये. |

सदरचे पद निव्वळ सहा महिन्याच्या कालावधीकरिता कंत्राटी पध्दतीने घेण्यात येणार असून पदाचा कार्यकाळ सहा महिन्याचा असेल, आवश्यकतेनुसार मुदतवाढ देण्यात येईल. उक्त पदाचे मासिक परिश्रमिक हे शासन निर्णयामध्ये नमुद परिशिष्ट-अ नुसार अदा करण्यात येईल. तसेच उक्त शासन निर्णयानुसार इच्छुक उमेदवाराची कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी. उमेदवारांनी संदर्भिय शासन निर्णयानुसार अर्ज संपूर्ण माहिती बायोडाटासह/फोटो व आवश्यक शैक्षणिक प्रमाणपत्र व सेवानिवृत्त आदेशासह (संबंधित कोषागार कार्यालयाचा दाखला व सेवा निवृत्ती पुर्व घेतलेल्या वेतनाचा संबंधित कार्यालयाचा दाखला) अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.

Sd-

(संजय हेरवाडे)

अतिरिक्त आयुक्त -२

ठाणे महानगरपालिका,ठाणे.

(मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने)